


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार दि. ०९ जूलै २०२६

आवृत्ती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी




संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २०९ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# पंढरीची वारी आहे माझे घरी ! आणिक न करी तीर्थव्रत !!
# संपदा सोहळा नावडे मनाला! लागला टकळा पंढरीचा !!

## आळंदीतून माऊलींचे पालखी सोहळ्याचे नामजयघोषात प्रस्थान

## हजारो वारक-यांची उपस्थिती ; श्रींचे चलपादुका पालखीची मंदिर प्रदक्षिणा

## पाहुणचारास सोहळा गांधी वाड्यात विसावला








आळंदी/अर्जुन मेदनकर (समर्थ गांवकरी)

**वारकरी संप्रदायाचे प्रतीक गळयात तुळशीमाळ, हातात भगव्या पताका, मुखाने हरिनामाचा गजर करीत लाखो भावीकांचे उपस्थितीत पोलीस बंदोबस्तात माउलींच्या पालखीचे प्रस्थान भक्ती मार्गाचे दैवत श्री विठ्ठल भगवान पांडुरंगाचे दर्शन आणि वारीला जाण्यास माउली मंदिरातील विना मंडपातून बुधवारी ( दि. ८ ) हरिनाम गजरात सायंकाळी सव्वा सहाचे सुमारास झाले.**

प्रस्थानला लाखो वारकरी भाविकांची गर्दी रोखण्यासाठी राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासन यांनी प्रयत्न केले. या साठी प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. या मुळे मर्यादित वारकरी, भाविकांचे उपस्थितीत श्रींचे पालखी सोहळ्याने प्रस्थान हरिनाम गजरात ठेवले. या वेळी आळंदीकर ग्रामस्थ युवक तरुणांनी श्रींची पालखी खांद्यावर घे, नाचवित माऊली माऊली जयघोष केला.

श्रींचे प्रस्थान प्रसंगी धर्मादाय सह आयुक्त दिनेश कोथळीकर, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, आमदार महेश लांडगे, पुणे जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, मुख्याधिकारी माधव खांडेकर, प्रांत अनिल दौन्डे, पोलीस निरीक्षक भीमा नरके, माजी विरोधी पक्ष गटनेते डी.डी.भोसले पाटील, डॉ. राम गावडे पाटील, उर्जितसिंह शितोळे सरकार, महादजी शितोळे सरकार, पालखी सोहळा प्रमुख अँड राजेंद्र उमाप, प्रमुख विश्वस्त डॉ भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, पुरुषोत्तम महाराज पाटील, चैतन्य महाराज लोंढे कबीरबुवा, रोहिणी पवार, बैल निवड समिती अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, माजी उपनगराध्यक्ष नंदकुमार कुऱ्हाडे, पालखी सोहळा मालक राजेंद्र बाळासाहेब आरफळकर, ऋषिकेश राजेंद्र आरफळकर, पोलीस नाईक मच्छिन्द्र शेंडे, श्रींचे सेवक चोपदार बाळासाहेब रणदिवे, राजाभाऊ चोपदार, मानकरी माजी नगराध्यक्ष राहुल चिताळकर, बाळासाहेब कु–हाडे, योगेश आरु, स्वप्नील कु–हाडे, फडकरी, दिंडीकरी, मानकरी यांचे उपस्थितीत झाले. प्रस्थान दिनी श्रींचे पूजेचे पौरोहित्य आळंदीतील श्रींचे पुजारी क्षेत्रोपाध्ये यांनी केले.

या वर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने आळंदीतील पुलांचे कठडे महापुराचे पाण्यात वाहून गेले. आळंदीतील महापुराने नागरी सेवा सुविधा कोलमडल्या. पिण्याचे पाण्यापासून थेट निवाऱ्या पर्यंतच्या समस्यां निर्माण झाल्याने प्रशासनाने आळंदीकडे भाविक कसे येणार नाहीत या साठी यंत्रणा राबविली. तरीही आळंदीत लाखावर भाविकांची उपस्थिती शहर परिसरात प्रस्थांन साठी होती. श्रींचा प्रस्थान सोहळा मात्र मर्यादित भाविकांचे उपस्थितीत झाला. प्रस्थानला लाखो वारकरी भाविकांची गर्दी रोखण्यासाठी राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासन यांनी प्रयत्न केले. झाल्याने प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. वारकरी, भाविकांचे उपस्थितीत श्रींचे पालखी सोहळ्याने प्रस्थान ठेवले.

अलंकापुरीत प्रदीर्घ वेळे नंतर श्रींचे अश्व आळंदीत प्रवेशले ; परंपरांचे अखेर पालन

श्रींचे अश्व आळंदीत आणण्यास देखील प्रचंड विलंब लावला. या मुळे देखील अनेकांत नाराजी राहिली. आळंदी ग्रामस्थ पदाधिकारी माजी नगराध्यक्ष राहुल चितळकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, पालखी सोहळ्याचे मालक राजेंद्र आरफळकर, अश्व सेवा मानकरी मालक उर्जितसिंह शितोळे सरकार, महादजीराजे शितोळे सरकार यांनी आळंदी देवस्थांनशी संवाद ठेवत रात्री उशिरा मंगळवारी ( दि. ७ ) श्रींचे अश्व मंदिरात प्रवेशले. आळंदी देवस्थान तर्फे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप, विश्वस्त रोहिणी पवार, योगी निरंजन नाथ, पुरुषोत्तम पाटील, चैतन्य लोंढे कबीरबुवा, व्यवस्थापक माउली वीर यांनी स्वागत करीत अश्व पूजा केली. त्या नंतर कारंजा मंडपातून श्रींचेअश्वानी दर्शन घेत मंदिर प्रदक्षिणा करीत मुक्काम स्थळी रात्री उशिरा पोहोचले. शितोळे सरकार आणि पालखी सोहळा मालक यांनी प्रथा परंपरांचे पालन करण्याची ठाम भूमिका घेत श्रद्धा जोपल्साल्या. अलीकडील काळात परंपरांना तडा लावण्याचे काम केले जात आहे. ते षडयंत्र मात्र या वर्षी धुळीस मिळवले गेले.

सोहळ्याचे थेट प्रक्षेपण सेवेने गर्दी वर उपाय

आळंदी देवस्थानने प्रस्थान सोहळा थेट प्रक्षेपण व्यवस्था केल्याने लाखो भाविक, नागरिकांना सोहळा आपापल्या घरात राहून सुरक्षित पणे पाहता आला. आनंदवारी सोहळ्याचा आनंद घेण्याची पर्वणी या मुळे नागरिक, भाविक यांना लाभली. मात्र दिंडीकरी आणि खांदेकरी यांचे मंदिर प्रवेशाचे संख्येवर नियंत्रण आणल्याने ग्रामस्थ आणि दिंडीतील वारकरी यांच्यात मोठी नाराजी राहिली. मंदिरात प्रवेश करण्याचे कारणावरुन पोलीस आणि वारकरी यांच्यात किरकोळ वादावादी झाली. यावेळी पोलिसांनी गर्दीवर नियंत्रण मिळविण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. वारकरी यांनी सुरक्षा कठडे ओलांडून प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. यावेळी किरकोळ वादंग झाले. माउली मंदिर परिसरातील रस्ते पोलीस प्रशासनाने भाविकांना येण्यास रोखल्याने भाविकांना थेट कळस व मंदिर प्रदक्षिणा करता आली नाही. येथील भागीरथी नाला मार्गावर अस्वच्छता, राडा रोडा आणि स्वच्छता प्रभावी नसल्याने भाविकांची गैरसोय झाली. नाल्यातून पाणी वाहिन्या ऐवजी नाल्यावरुन पाणी वाहिले जात असल्याने गैरसोयीच्या वाढ झाली. मंदिर परिसरातील राम घाट, दगडी दोन घाट, शनी मारुती मंदिर मार्ग, भागीरथी नाला मार्ग वापरावर मर्यादा आल्याने इतर मार्गावर भाविक आले. मात्र भाविकांना येथून देखील पुढे जाण्यास मर्यादा आणल्याने नाराजीचा वाढ झाली. मंदिर परिसरात प्रस्थान दिनी पोलिसानांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आळंदी परिसरात होत असलेल्या पावसाने परिसरातील रस्ते आळंदीत येण्यास बंद ठेवण्यात आल्याने वारकरी दिंड्याची गैरसोय झाली. इंद्रायणी नदीचे पाणी नदीचे पाणलोट आणि लाभ क्षेत्रात वाढत असल्याने प्रशासनाने दक्षता घेण्याचे आवाहन केले. या मुळे अनेकांनी एस टी. स्टॅन्ड येथील निवारा शेडचा सहारा शोधला. तिथे पुरेशा प्रमाणात नागरी सेवा सुविधा देण्यात आल्या. संततधार पावसाचे सरीत प्रस्थान सोहळा उत्साही आनंददायी वातावरणात झाला. श्रींचे सोहळ्यातील प्रथा परंपरांचे पालन करीत मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. यात पहाटे घंटानाद, काकडा, पवमान अभिषेख, श्रींचे संजीवन समाधी दर्शन, मंदिर स्वच्छता, प्रस्थान दिनी मंदिर परिसरात केलेली लक्षवेधी पुष्पसजावट भाविकांनी पहात सोहळा अनुभवाला. आळंदीतील नगरप्रदक्षिणा मार्गावर भाविकांच्या दिंड्यानी प्रदक्षिणा करीत सोहळ्यास हजेरी लावली. या वर्षी पालखी सोहळ्यातील पावसाने परिसरात मोठी तारांबळ उडाली मात्र अनेकांनी आपली सोहळ्यातील हजेरी लावत सेवा कायम रुजू करीत उपस्थिती ठेवली.

अलंकापुरीत प्रस्थान सोहळ्या पूर्वी परंपरांचे पालन करीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात मंदिरात पहाटे काकडा आरती, पवमान अभिषेक झाला. मंदिरात भाविकांना दर्शनास दुपार पर्यंत सोय करण्यात आली होती. श्रींचे संजीवन समाधी दर्शनास भाविकांनी गर्दी केली.

दरम्यान नऊ वाजता वीणा मंडपात परंपरेने कीर्तन सेवा झाली. दुपारी परंपरेने मंदिरात श्रीनां महानैवेद्य झाला. मंदिरात सेवेकरी व स्वकाम सेवक यांनी स्वच्छता स्वयंसेवक यांचे माध्यमातून सेवा रुजू केली. मंदिर प्राकार व श्रींचा गाभारा प्रस्थानपूर्व स्वच्छ करण्यात आला. सेवाभावीवृत्तीने सेवकांनी आपली सेवा रुजू केली.

पालखी पायी वारी सोहळा असल्याने सोहळ्यातील इतर कार्यक्रम हरिनाम गजरात झाले. सोहळ्यास यावर्षी परंपरेने दुपारी सुरुवात झाली. दरवर्षी प्रस्थान दिनी दुपारी दोन ते तीनच्या सुमारास श्रींचे रथापुढील आणि रथामागील मानाच्या ४७ दिंड्यांतील मर्यादित भाविकांना मंदिरातील देऊळवाड्यात सोहळ्यातील परंपरे प्रमाणे चोपदार यांचे सूचनां प्रमाणे प्रवेश देण्यात आला. यावर्षी दिंड्या व संबंधित दिंडी प्रमुख, वारकरी घटकांचे स्थानिक प्रतिनिधी यांना देखील मर्यादित स्वरूपात प्रवेश देण्यात आला. दरम्यान श्रींचे मंदिरात माउलींच्या समाधीवर ११ ब्रह्मवृंदाच्या वतीने श्रीनां वैभवी पोशाख झाल्यावर श्री गुरू हैबतरावबाबांच्या वतीने माउलींच्या समाधीची परंपरेने आरती हरिनाम गजरात झाली. त्यानंतर आळंदी देवस्थान तर्फे श्रींची आरती झाली. दरम्यान श्रींचे वैभवी चांदीचे पादुका पालखी प्रस्थानासाठी पुष्प सजावटीने सजलेल्या पालखी चौथ–या वर वीणा मंडपात ठेवण्यात आल्या. श्रींचे चलपादुकांची विधिवत प्राण प्रतिष्ठापना संस्थान तर्फे वेदमंत्र जयघोषात झाली. या वेळी सोहळ्यातील नियमा प्रमाणे आळंदी संस्थानच्या वतीने मानकऱ्यांना पागोटे वाटप, श्रीगुरू हैबतरावबाबांच्या वतीने दिंडी प्रमुखांना पालखी सोहळ्याचे मालक राजेंद्र आरफळकर, बाळासाहेब आरफळकर यांचे हस्ते नारळ प्रसाद वाटप झाले. श्रींचे संजीवन समाधी गाभाऱ्यात आळंदी देवस्थान च्या वतीने परंपरेने मानकरी यांना नारळ प्रसाद देण्यात आला. परंपरेने धार्मिक उपक्रम होताच श्रींचे चलपादुका देवस्थान तर्फे पालखी सोहळ्याचे मालक राजेंद्र व बाळासाहेब आरफळकर यांचे कडे देण्यात आल्या. मालक आरफळकर यांचे नियंत्रणात श्रींचे पादुका पालखीतून मंदिर प्रदक्षिणा हरिनाम गजरात झाली. श्रींचे वैभवी चलपादुका मालकांकडे हरिनाम गजर करीत पालखीत विधिवत पूजा झाली. श्रींची पालखी आळंदीकर ग्रामस्थ यांनी माऊली माऊली असा नामजयघोष करीत खांद्यावर उचलीत वारीला जाण्यास वीणा मंडपातून पंढरी कडे हरिनाम गजरात प्रस्थान ठेवले. या वर्ष ठराविक मान्यवरांना दिंडीतुन प्रवेश देण्यात आला.

माऊलींचे पादुकां पालखीची हरिनाम गजरात मंदिर प्रदक्षिणा झाल्या नंतर श्रींचे पादुका पालखी सोहळा आजोळघरा लगतच्या जुन्या रामवाड्याचे गांधी वाड्यात दर्शनबारी सभागृहात हरिनाम गजरात आणण्यात आल्या. येथे सोहळ्यातील परंपरांचे पालन करीत समाज आरतीने श्रींचा वैभवी सोहळा विसावला. आळंदीत यावर्षी पहिला एक मुक्काम होत श्रींची पालखी पुढील दोन दिवसांचे मुक्कामासाठी पुण्यनगरीकडे गुरुवारी सकाळी ( दि. ९ ) मार्गस्थ होईल. यावर्षी इंद्रायणी नदीला आलेल्या महापुराने पालखीचा पुण्यनगरीकडे जाण्याचा मार्ग बदलण्यात येत आहे. चऱ्होली खुर्द मार्गे सोहळा पुढे मार्गस्थ होणार असल्याचे देवस्थानने जाहीर केले आहे.

पायी वारी असल्याने मर्यादित स्वरूपाची भाविकांची सोहळ्यास उपस्थिती राहिली. आळंदी देवस्थान ने श्रींचे सोहळ्याचे थेट प्रक्षेपण व्यवस्था केल्याने घरी राहून लाखो नागरिकांना सोहळा पाहता आला. यावर्षी श्रींचे पालखीची मंदिर प्रदक्षिणा, ग्राम प्रदक्षिणा हरिनाम जय घोषात झाली. आळंदी मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावट लक्षवेधी होती. नदी घाटावर देहू आळंदी विकास समितीचे वतीने या वर्षी कोणतेही लोकशिक्षणपर कार्यक्रम झाले नाहीत. थेट प्रक्षेपण असल्याने नागरिकांनी घरात राहून पालखी सोहळ्याचा आनंद लुटला. आळंदी मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावटने भाविकांची दाद घेतली.

या वर्षीआळंदीतून पालखी चऱ्होली खुर्द मार्गे पुण्याकडे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा मार्ग बदलण्यात आला असल्याचे आळंदी देवस्थान ने पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना काळवीट चऱ्होली खुर्द रस्त्याचे देखभाल दुरुस्तीची मागणी केले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान नंतर पहिला मुक्काम आळंदी येथील आजोळतर गांधी वाड्यातील दर्शन बारी येथे झाल्यावर गुरुवारी ( दि.९ ) सकाळी पुण्यनगरीकडे हरिनाम गजरात निघेल. आळंदीतील दोन्ही पुलां वरून पाण्याचा प्रवाह बंद झाला आहे. मात्र पुलांची परिस्थिती चांगली नसल्याचे देवस्थानने सांगितले आहे. त्यामुळे माऊलींच्या पालखीचा मार्ग बदलण्याचा निर्णय आळंदी देवस्थान ट्रस्टने घेतला आहे. या वर्षी नवीन मार्ग आळंदी येथून चऱ्होली खुर्द ते दाभाडे सरकार चौक या मार्गाने पुढे चऱ्होली बुद्रुक मार्गे चऱ्होली फाटा आणि पुढे आळंदी पुणे मार्गाने पालखी सोहळ्याचे पायी वारी प्रवास होईल. असे देवस्थाने निर्णय घेत कळविले आहे. दाभाडे सरकार चौक आणि चऱ्होली खुर्द येथील पुलाच्या दोन्ही बाजूचे खड्डे बुजवण्याचे आदेश अधिकाऱ्यांना सूचना देत देवस्थानने मागणी केली आहे. तिथे प्रत्यक्ष भेट देऊन काम लवकर पूर्ण करण्यासह पालखी साठी रस्त्याची रुंदी वाढविण्यास आळंदी देवस्थानने मागणी केली असल्याचे पत्र पुणे जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

आळंदीत प्रस्थान सोहळ्या येता न आल्याची भाविकांची खंत प्रस्थान दिनी प्रस्थान सोहळ्यास उपस्थित राहता न आल्याने अनेक भाविकांनी खंत व्यक्त केली. मात्र पुण्यापासून पुढे सोहळ्यात सहभागी होऊन आनंदवारी अनुभवणार असल्याचे सांगितले.

पब्लिक अड्रेस सिस्टीम प्रभावी

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी प्रस्थान सोहळ्या अंतर्गत पायी वारी पूर्व नियोजनासाठी तसेच भाविक नागरिकांना सेवा सुविधांची माहिती देण्यात सोहळ्यात आळंदी पोलीस विभागाचे वतीने पब्लिक अड्रेस सिस्टीम प्रभावी राबविण्यात आली. भाविक, नागरिकांच्या तसेच मंदिर व परिसरात आरोग्य आणि सुरक्षिततेस प्राधान्य देत भाविकांना सूचना आणि मार्गदर्शन केले जात होते. यासाठी आळंदी देवस्थान, आळंदी पोलीस स्टेशन, आळंदी नगरपरिषद, आळंदी ग्रामीण रुग्णालय, पुणे जिल्हा परिषद आरोग्य सेवा, महसूल प्रशासन आणि वीज महावितरण यांनी कंबर कसली. भाविकांसह नागरिकांना प्रस्थान सोहळा काळात नागरी सेवा सुविधांस नियोजन पूर्व आढावा बैठकीत दिलेल्या सूचना आदेशा प्रमाणे प्रशासनाने कामकाज करीत सेवा रुजू केल्या आहेत. आळंदीकर ग्रामस्थ यांनी श्रींचे पालखीला खांदा देत श्रींची पालखी हरिनाम गजरात हरिनाम गजरात वाहिली.

या वर्षी चे प्रस्थान दिनी नियोजनाचा प्रचंड अभाव राहिला. अतिशय चुकीचे नियोजन होते. भाविकांना मंदिराच्या आसपास ही फिरकू देण्यात आले नाही. बाहेरून प्रदक्षिणा करून दिली नाही. या वर्षी पावसाचे कारणाने भाविकांची संख्या मंदिरात फारच कमी राहिली. पोलीस यंत्रणा, मंदिर प्रसाशन, नगरपरिषद यांचा मध्ये सुसंवाद ताळ मेळ तसेच देवस्थानचे विश्वस्त यांच्यात एक वाक्यता नव्हती असे अनेक जाणकारांनी सांगितले. इंद्रायणी नदीला आलेल्या पुराचे कारण दाखवून फारच हलगर्जी पणाअनेक कामांत दिसून आल्याचे माजी उपनगराध्यक्ष नंदकुमार कुऱ्हाडे पाटील यांचेसह अनेक भाविक, नागरिकांनी सांगितले. अनेक भाविक बाहेर गावाहून आळंदीत श्रींचा वैभवी पालखी सोहळा पाहण्यास येथे येत असतात. त्या सर्व भाविकांची घोर निराशा झाली. प्रत्येकाला पोलिसानी विनाकारण अडविले. अनेक ठिकाणाहून भाविकांना मंदिराकडे कलश दर्शनास देखील येऊ दिले नसल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त करत गाव कारभारी, देवस्थानचे कारभारी यांनी दोष देत असल्याचे दिसले.

इंद्रायणी नदीचा पूर कमी झाला असून देखील आळंदीत प्रवेश करण्यास भाविकांना रोखण्यात आले. आळंदीतील चारही पुला खालून आता पाणी वाहत आहे. मात्र तरी देखील पोलिसां कडून स्थानिक नागरिक व वारकऱ्यांची अडवणूक झाली. आळंदीत सोडण्यास मनाई केल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

**ठळक : –**

**अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र, जेथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र.**

**महिलांसह पुरुषांनी फूगड्या खेळत समानतेचा संदेश देत प्रस्थान सोहळ्यातील वारीत पावले खेळली.**

**अश्वांचे माऊली मंदिरात सव्वा चारचे सुमारास आगमन झाले.**

**इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहते. भाविकांची मर्यादित गर्दी सह नदीला महापूर**

**श्रींचे वैभवी दर्शनासह मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावट**

**नगरप्रदक्षिणा मार्गावर दिंड्यांचा हरिनाम गजर**

**प्रदक्षिणा मार्गावर वाहनाची रहदारी कायम**

**आळंदीतील पूल रहदारीला बंद ; तत्काळ**



**नियोजनाचा अभाव**

**आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाजावर प्रश्नचिन्ह**

**माऊली मंदिरात भक्तिमय उत्साहात नाम जयघोष**

**श्रींचे अश्वांचे स्वागतास प्रस्थान दिनी रेड कार्पेट**

**महिलांसह पुरुषांनी फूगड्या खेळत समानतेचा संदेश .**

**अलंकापुरी पुण्यभूमी पवित्र, जेथे नांदतो ज्ञानराजा सुपात्र.**

**इंद्रायणी नदी दुथडी भरून वाहते. भाविकांची मर्यादित गर्दी सह नदीला महापूर**

**पुलाचे कठडे दुरुस्तीला वेग**

**श्रींचे वैभवी दर्शनासह मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावट**

**नगरप्रदक्षिणा मार्गावर दिंड्यांचा हरिनाम गजर**

**प्रदक्षिणा मार्गावर वाहनाची रहदारी कायम**

**आळंदीतील पूल रहदारीला बंद ; तत्काळ नियोजनाचा अभाव ; आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाजावर प्रश्नचिन्ह**

**माऊली मंदिरात भक्तिमय उत्साहात नाम जयघोष**

**माऊली मंदिरात प्रस्थान सोहळ्यात तसेच प्रदक्षिणा मार्गावर उर्वरित दिंड्यांचा नाम जयघोष**

**अलंकापुरीत ज्ञानोबा तुकाराम नामजयघोषात माऊलींचे पालखी सोहळ्याचे प्रस्थान**

**इंद्रायणी नदीला महापूर ; भाविकांचे स्थान महात्म्य स्नान स्वप्न भंगले**



# अभ्यासक्रमातील बदल : आधुनिक शिक्षणाकडे वाटचाल

शिक्षण हे कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मूलभूत साधन मानले जाते. काळानुसार समाज, विज्ञान, तंत्रज्ञान आणि रोजगाराच्या संधींमध्ये मोठे बदल होत असतात. त्यामुळे शिक्षणव्यवस्थाही बदलत्या गरजांनुसार अद्ययावत होणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम बनविण्यासाठी अभ्यासक्रमात वेळोवेळी बदल करणे ही काळाची गरज आहे. महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने शालेय अभ्यासक्रमात अनेक महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. या बदलांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे.

पूर्वीच्या शिक्षणपद्धतीत पाठांतराला अधिक महत्त्व दिले जात असे. विद्यार्थी अनेक गोष्टी पाठ करत असत; परंतु त्यामागील संकल्पना समजून घेण्यावर तुलनेने कमी भर दिला जात होता. नवीन अभ्यासक्रमामध्ये मात्र विद्यार्थ्यांनी संकल्पना समजून घ्याव्यात, प्रश्न विचारावेत, शोध घ्यावा आणि स्वतः च्या अनुभवातून ज्ञान मिळवावे यावर भर देण्यात आला आहे. यामुळे विद्यार्थ्यांची विचारशक्ती, सर्जनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होईल.

नवीन अभ्यासक्रमात विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे. शिक्षकांची भूमिका केवळ माहिती देणाऱ्याची नसून मार्गदर्शकाची आहे. वर्गातील अध्यापन अधिक कृतीप्रधान, अनुभवाधारित आणि आनंददायी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. विविध प्रकल्प, प्रयोग, चर्चासत्रे, गटकार्य, निरीक्षणे आणि स्थानिक परिस्थितीशी संबंधित उपक्रम यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळणार आहे.

गणित विषयामध्ये तर्कशक्ती, विश्लेषणात्मक विचार, समस्या सोडविण्याची क्षमता आणि गणिताचा दैनंदिन जीवनातील उपयोग यावर विशेष भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी केवळ सूत्रे पाठ न करता त्यांचा अर्थ समजून घेऊन त्यांचा वापर करावा, अशी अपेक्षा आहे. गणितातील भीती दूर करून विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी आवड निर्माण करणे हे नवीन अभ्यासक्रमाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

विज्ञान विषयात प्रयोगशीलता, निरीक्षणशक्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यावर भर दिला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या सभोवतालच्या घटनांचे वैज्ञानिक कारण समजून घ्यावे आणि विज्ञानाचा उपयोग समाजाच्या प्रगतीसाठी कसा होतो हे जाणून घ्यावे, यासाठी विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

भाषा विषयांमध्ये वाचन, लेखन, संभाषण आणि अभिव्यक्ती कौशल्यांचा विकास करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता विविध साहित्यप्रकार वाचावेत, स्वतःचे विचार प्रभावीपणे मांडावेत आणि भाषेचा वापर आत्मविश्वासाने करावा, यासाठी अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

नवीन अभ्यासक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भारतीय ज्ञानपरंपरा, संस्कृती, नैतिक मूल्ये, पर्यावरण संवर्धन आणि तंत्रज्ञानाचा समतोल वापर यांचा समावेश. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, सामाजिक जबाबदारी, पर्यावरणाबद्दलची जागरूकता आणि मानवी मूल्यांची जपणूक व्हावी यासाठी विविध विषयांमध्ये या घटकांचा समावेश करण्यात आला आहे.



विजय दुंदा कातडे
(प्राथमिक शिक्षक)
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रणद खुर्द.
मोबाईल-९०४९६९२२२०
शिक्षण- एम ए एम एड

तसेच, डिजिटल युगाच्या गरजा लक्षात घेऊन संगणकीय कौशल्ये, तंत्रज्ञानाचा वापर, माहितीचे विश्लेषण आणि नवोन्मेषी विचार यांनाही महत्त्व देण्यात आले आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांना या क्षेत्रांसाठी तयार करण्याचा प्रयत्न नवीन अभ्यासक्रमातून करण्यात आला आहे.

मूल्यमापन पद्धतीमध्येही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. केवळ वार्षिक परीक्षेवर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण प्रगतीचे मूल्यमापन करण्यावर भर देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाबरोबरच कौशल्ये, वृत्ती, सहभाग आणि सर्जनशीलता यांचाही विचार करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांवरील परीक्षेचा ताण कमी होण्यास मदत होईल. अभ्यासक्रमातील हे बदल यशस्वी होण्यासाठी शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. शिक्षकांनी आधुनिक अध्यापन पद्धतींचा स्वीकार करणे, पालकांनी मुलांना प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्तीने शिक्षण घेणे गरजेचे आहे. सर्व घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास शिक्षण अधिक परिणामकारक आणि गुणवत्तापूर्ण होईल. शेवटी असे म्हणता येईल की, अभ्यासक्रमातील बदल ही केवळ पाठ्यपुस्तकांची फ रबदल प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांना सक्षम, आत्मनिर्भर, सर्जनशील आणि जबाबदार नागरिक बनविण्याची एक व्यापक योजना आहे. बदलत्या जगाशी जुळवून घेण्यासाठी आणि भारताला ज्ञानसंपन्न राष्ट्र बनविण्यासाठी हे बदल अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. योग्य अंमलबजावणी आणि सर्वांच्या सहकार्यामुळे नवीन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक भक्कम पाया निर्माण करेल.

## तीर्थक्षेत्र उत्तरेश्वर जुन्नर - देहू - पंढरपूर पायी दिंडी सोहळा शिरोली बुद्रुक मध्ये स्वागत



शिवनेरी (समर्थ गांवकरी)

तीर्थक्षेत्र उत्तरेश्वर येथील जुन्नर - देहू - पंढरपूर पायी दिंडी सोहळा जुन्नर तालुका मधील वारकरी पावसाच्या रिमझिम सरी अंगावर घेत महिला भगिनी डोक्यावर तुळस , वारकरी हातात भगवा ध्वज , खांद्यावरी विना , हातात टाळ , मृदुंगाची साद , डोक्यावर तुळस , मुखामध्ये पंढरीशी जारे आल्यानो संसारा । दिनाचा सोयरा पांडुरंग । वाट पाहे उभा भेटीची आवडी कृपाळू तातडी उतावीळ ।। अभंग गात शिरोली बुद्रुक मध्ये स्व. निवृत्ती शेठ शेरकर यांच्या स्मरणार्थ श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना चेअरमन सत्यशील शेरकर व ग्रामस्थांच्या उपस्थितीत वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले .

जुन्नर - देहू - पंढरपूर पायी दिंडी सोहळा जुन्नर तालुका दिंडीचा क्रमांक २४ असून ४८ वर्ष अखंड सेवा सुरू आहे . या दिंडीचे प्रस्थान मंगळवार दि. ३० जुन ते सांगता मंगळवार दि ११ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे .

पहाटे ४ वा . काकडा आरती , अभंग ,भजन, प्रवचन , सायं. ६ . वा . हरिपाठ ,कीर्तन,जागर असा रोजचा नित्यनियम असल्यामुळे या सोहळ्यात गोळेगाव , दिल्ली पेठ , पणसुंबा पेठ , शुक्रवार पेठ , आगर वस्ती , अमरापूर , सुसरबाग , विठ्ठलवाडी , हापूस बाग , शिरोली बुद्रुक , आढी , धालेवाडी, विघ्नहर सहकारी साखर कारखाना मार्गे पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे . आपल्या गावातून व घरा शेजारून वारकऱ्यांची पायी दिंडी जात असल्यामुळे ठीक ठिकाणी चैतन्याचे वातावरण पाहावयास मिळाले .

या दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष ह भ प. रामभाऊ शंकर डोंगरे व विणेकरी ह भ प अंबादास शंकर डोके व सर्व वारकऱ्यांचे ठिकठिकाणी भाविक भक्त अलिंगन देऊन सर्वांना नाष्टा , फराळ , चहा , व अन्नदान करण्यात आले.

## पावसाळ्यात वीज सुरक्षिततेचे नियम पाळा; नागरिकांना महावितरणचे आवाहन

### महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे विभागीय सचिव अमोल आभाळे यांचे पत्रक

सध्या राज्यभर सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर वीज अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे विभागीय सचिव श्री. अमोल आभाळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.



पत्रकात म्हटले आहे की, पावसाळ्यात तुटलेल्या वीजतारा, वाकलेले वीज खांब, रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) तसेच इतर विद्युत उपकरणांपासून सुरक्षित अंतर राखावे. अशा ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत स्पर्श करू नये. तुटलेली वीजतार आढळल्यास तात्काळ महावितरणच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा १९१२, १८००-२१२-३४३५ अथवा १८००-२३३-३४३५ या हेल्पलाईन क्रमांकावर माहिती द्यावी.

पावसामुळे पाण्याखाली गेलेल्या भागात विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. घरात पाणी शिरल्यास मुख्य वीजपुरवठा (मेन स्विच) त्वरित बंद करावा. ओल्या हाताने स्विच, प्लग किंवा कोणतेही विद्युत उपकरण हाताळू नये. वीजपुरवठा खंडित झाल्यास स्वतः दुरुस्ती करण्याचा प्रयत्न न करता अधिकृत महावितरण कर्मचाऱ्यांमार्फतच दुरुस्ती करून घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. तसेच वीजतारांवर झाडांच्या फांद्या पडल्याचे दिसल्यास त्या स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. शेतातील वीजपंप सुरू करण्यापूर्वी वीजजोडणी सुरक्षित असल्याची खात्री करून घ्यावी. अफवांवर विश्वास न ठेवता महावितरण व स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे श्री. आभाळे यांनी म्हटले आहे.

तुटलेली वीजतार दिसल्यास दूर रहा, स्पर्श करू नका आणि तात्काळ महावितरणला कळवा, असा संदेश देत श्री. अमोल आभाळे यांनी सर्व वीज ग्राहकांनी स्वतःची आणि इतरांची सुरक्षितता जपण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

## भंडारदरा परिसरात मुसळधार पावसाचा कहर; कोलटिंब येथे भूस्खलन, पर्यटकांना सतर्कतेचे आवाहन!

भंडारदरा (समर्थ गांवकरी)

भंडारदरा परिसरात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढत असून रात्रीपासून ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून ओढे-नाले दुथडी भरून वाहत आहेत. भातशेतीत मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने भात लागवडीची कामे ठप्प झाली आहेत. तसेच शेतकऱ्यांनी शेळ्या-बकऱ्यांसह जनावरे सुरक्षिततेच्या दृष्टीने गोठ्यातच बांधून ठेवली आहेत.



कळसुबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्य परिसरातील धबधबे पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येत असले, तरी कालपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे वन्यजीव विभागाने पर्यटकांना विशेष सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. निसरड्या ठिकाणी वाहने उभी करू नयेत, धोकादायक ठिकाणी जाऊन छायाचित्रे काढू नयेत तसेच वेगाने कोसळणाऱ्या धबधब्याखाली उभे राहू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. पावसाच्या वाढत्या प्रवाहामुळे दगड व माती कोसळण्याचा धोका असल्याने दुर्घटना टाळण्यासाठी विभागाचे अधिकारी व कर्मचारी सतत गस्त घालत आहेत.

दरम्यान, आज दुपारी सुमारे १२ ते १ वाजण्याच्या सुमारास कोलटिंब येथे भूस्खलन होऊन दगड व माती रस्त्यावर आल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. वन्यजीव विभागाने तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाला माहिती देत स्वतःही रस्त्यावरील माती व दगड हटवून वाहतूक सुरळीत केली. त्यामुळे भंडारदरा परिसरात येणाऱ्या पर्यटकांनी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करून सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन वन्यजीव विभागाने केले आहे.

## भविष्याची तयारी; वेंकटेश पोदार लर्न स्कूलमध्ये एआय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन




श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

वेंकटेश पोदार लर्न स्कूल, श्रीगोंदा येथे इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (rtificial Intelligence - AI) विषयावरील जनजागृती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत AI तज्ज्ञ श्री. रोहित जैन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत श्री. जैन यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची मूलभूत संकल्पना, तिचा जबाबदारीने व योग्य पद्धतीने वापर, शिक्षणातील महत्त्व, AI संदर्भातील गैरसमज तसेच त्याचे फायदे आणि मर्यादा याविषयी सविस्तर माहिती दिली. AI चा वापर सर्जनशीलता, चिकित्सक विचारशक्ती आणि मौलिकता जपत शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी करावा, असा मौल्यवान संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारले. त्यामुळे कार्यशाळा ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि आनंददायी वातावरणात पार पडली.

हा कार्यक्रम शाळेचे संचालक मा. आनंद शहा, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने आणि प्रभावीपणे वापर करून भविष्यकालीन शिक्षणासाठी स्वतःला सज्ज करण्याची प्रेरणा मिळाली.

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

EQJ COURT CASE NO - 00090/2026

१. राहुल मधुकर वर्पे, २. प्रमोद मधुकर वर्पे,
रा. विरगाव, ता.अकोले, जि.अहिल्यानगर

विरुध्द.....१.धावजी कान्हु ठाकर, रा. विरगाव, ता.अकोले,जि.अहिल्यानगर

या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, अर्जदार राहुल मधुकर वर्पे व इतर १ रा. विरगाव, ता. अकोले यांनी मौजे वाकी येथील स.नं. ग.नं. ३०३ या जमिनीबाबत बॉम्बे टेनन्सी ॲक्टचे कलम १४, २९ व ३१ अन्वये विनंती अर्ज सादर केलेला आहे.

तरी अर्जदार यांनी सादर अर्जाबाबत दिनांक २८/०७/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले येथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. आपणाकडे उपलब्ध कागदपत्रासह सदर दिनांकास आपण उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत आपले काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/०७/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार अकोले तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

## डोंगराळ कनाशीत पेटला सूर्या शून्यातून उभा केला तीनशे कुटुंबाचा आधारवड

### अशक्याला शक्य केलं : कनाशीच्या मातीतून उगवला किरण निखाडेंचा उद्योग वटवृक्ष
### कनाशीचा कायापालट : एका माणसाने पालटला संपूर्ण पट्याचा चेहरा

कनाशी/अनिल पवार
(समर्थ गांवकरी)

कळवण तालुक्यातील दुर्गम भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कनाशी गावात एका छोट्या व्यवसायाची पेरणी करून सूर्या उद्योग समूहाचे संचालक किरणभाऊ निखाडे यांनी आज वटवृक्षासारखा उद्योग उभा केला आहे. त्यांच्या जिद्द, चिकाटी आणि दूरदृष्टीची हीच आज पावती आहे.

दोन दशकांपूर्वी कनाशीसारख्या डोंगराळ, आदिवासी बहुल भागात उद्योग उभा करणे अशक्य वाटत होते. मात्र किरण निखाडे यांनी धाडस केले.

आज कनाशीमध्ये त्यांच्या नावाने सूर्या पेट्रोलियम, सूर्या हॉटेल, श्रीमती मंदाकिनीताई निखाडे प्रायव्हेट मार्केट आणि सूर्या पावरट्रक ट्रॅक्टर शोरूम अशी विविध उद्योगाची जाळी पसरली आहे.

शून्यातून सुरू केलेल्या या प्रवासाचे रूपांतर आज हजारो लोकांच्या रोजीरोटीमध्ये झाले आहे.

आज या उद्योग समूहात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे २०० ते ३०० कर्मचाऱ्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे. बेरोजगारीच्या विळख्यात सापडलेल्या तालुक्यासाठी हे मोठे संजीवनी ठरले आहे. त्यामुळेच तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून निखाडे यांच्या कार्याचे कौतुक केले जाते.

वाढदिवस म्हणजे समाजसेवेचा दिवस

किरणभाऊ निखाडे यांचा वाढदिवस दरवर्षी आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा होतो. कधी वृक्षारोपण करून, कधी रक्तदान शिबीर घेऊन, तर कधी शालेय विद्यार्थ्यांना शालेय वस्तू वाटप करून किंवा अन्नदान करून ते आपला वाढदिवस साजरा करतात.

आजही त्यांच्या वाढदिवसानिमित्त कनाशी येथे विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. यावेळी तरुण-तरुणींना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, माझा उद्देश फक्त व्यवसाय वाढवणे नाही, तर बेरोजगार युवकांच्या हाताला काम देणे आहे. युवकांनी स्वतःच्या पायावर



उभे राहावे, हीच खरी माझी वाढदिवसाची भेट.

कनाशीपासून तालुकाभरात किरणभाऊ हे युवकांचे 'आयकॉन' बनले आहेत. उद्योगासोबतच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या नेतृत्वामुळे त्यांना प्रत्येकाच्या मनात मानाचे स्थान आहे. शून्यातून सुरू केलेल्या एका व्यवसायाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले. कनाशीच्या मातीत रुजलेला हा 'सूर्या' आज संपूर्ण कळवण तालुक्याला उर्जा देत आहे.

### ग्रामपंचायत चावंड, ता.जुन्नर, जि.पुणे
### निविदा सुचना क्र. १० सन २०२५/२०२६

ग्रामपंचायत चावंड, ता.जुन्नर, जि.पुणे यांचे तर्फे ग्रामविकास विभाग ग्रामपंचायत चावंड यांचेकडील पंजीकरण / नोंदणीकृत केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांजकडुन दोन लिफाफयात पध्दतीने खालील कामांच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | कामाची कालवधी | निविदा प्रसिध्दी दि. | निविदा स्विकारण्याचा अंतिम दि. | निविदा उघडणे दिनांक | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | केळी अंतर्गत गटर बांधणे | ११६६३०/- | ५००/- | ५००/- | ५००/- | ३ महिने | ०६/०४/२०२६ | ०८/०४/२०२६ | ०९/०४/२०२६ | बी १ |
| २ | चावंड अंतर्गत गटर बांधकाम | १५०००० /- | ५००/- | ५००/- | ५००/- | ३ महिने | ०६/०४/२०२६ | ०८/०४/२०२६ | ०९/०४/२०२६ | बी १ |
| ३ | माणकेश्वर अंतर्गत गटर बांधकाम करणे. | १५१५७५/- | ५००/- | ५००/- | ५००/- | ३ महिने | ०६/०४/२०२६ | ०८/०४/२०२६ | ०९/०४/२०२६ | बी १ |
| ४ | फरशी बसविणे. | १००००० /- | ५००/- | ५००/- | ५००/- | ३ महिने | ०६/०४/२०२६ | ०८/०४/२०२६ | ०९/०४/२०२६ | बी १ |
| ५ | पत्रा शेड बांधकाम करणे. | १५०००० /- | ५००/- | ५००/- | ५००/- | ३ महिने | ०६/०४/२०२६ | ०८/०४/२०२६ | ०९/०४/२०२६ | बी १ |
| ६ | पत्रा शेड बांधकाम करणे. | १००००० /- | ५००/- | ५००/- | ५००/- | ३ महिने | ०६/०४/२०२६ | ०८/०४/२०२६ | ०९/०४/२०२६ | बी १ |
| ७ | ग्रामपंचायती समोरील जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे. | १४८८१६/- | ५००/- | ५००/- | ५००/- | ३ महिने | ०६/०४/२०२६ | ०८/०४/२०२६ | ०९/०४/२०२६ | बी १ |
| ८ | ग्राम कार्यालय देखभाल व दुरुस्ती करणे. | ५५५००/- | ५००/- | ५००/- | ५००/- | ३ महिने | ०६/०४/२०२६ | ०८/०४/२०२६ | ०९/०४/२०२६ | बी १ |

टिप - १) वरील कामाची सविस्तर पत्रके ग्रामपंचायत नोटीस बोर्ड, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
२) कोणतीही निविदा स्वीकारण्याचा, नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायत यांनी राखुन ठेवलेला आहे.

**लोकनियुक्त सरंपच**
**ग्रामपंचायत चावंड, ता.जुन्नर, जि.पुणे**

**ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत चावंड, ता.जुन्नर, जि.पुणे**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# कल्याण-अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गासाठी व्यापक संघर्ष उभारणार; माळशेज रेल्वे कृती समितीचा निर्धार!






अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

पुणे-नाशिक रेल्वेमार्गाला मंजुरी मिळाल्यानंतर आता कल्याण-मुरबाड-माळशेज-शिवनेरी-वासुंदे-अहिल्यानगर-बीड-परळी या महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पासाठी राज्यव्यापी जनआंदोलन उभारण्याचा निर्धार माळशेज रेल्वे कृती समितीने व्यक्त केला आहे. महाराष्ट्राच्या संतुलित विकासासाठी हा रेल्वेमार्ग अत्यावश्यक असून, त्यास तातडीने मंजुरी देण्याची मागणी समितीने केली आहे.

समितीचे अध्यक्ष दिनेशचंद्र हुलवळे, उपाध्यक्ष मुरलीधर गुंजाळ, दादा भालेकर आणि मिलिंदराव गंधे यांनी पत्रकार परिषदेत ही भूमिका मांडली. यावेळी जिल्हा परिषद सदस्या कल्पना वैभवराव काळे उपस्थित होत्या.

समितीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुणे-हडपसर-चाकण-अहिल्यानगर-राहुरी-शिर्डी-नाशिक हा प्रस्तावित रेल्वेमार्ग मंजूर केल्याबद्दल केंद्र सरकार, रेल्वेमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या मार्गावर ताशी १६० ते २०० किलोमीटर वेगाने धावणाऱ्या रेल्वेमुळे पुणे-नाशिक हे २३५ किलोमीटरचे अंतर अवघ्या दोन तासांत पार करणे शक्य होणार आहे.

याच धर्तीवर प्रस्तावित मुंबई-लातूर जनकल्याण एक्स्प्रेसवेच्या समांतर कल्याण-अहिल्यानगर रेल्वेमार्गाला मंजुरी देऊन रेल्वे जाळ्याचा 'त्रिकोण' पूर्ण करावा, अशी मागणी समितीने केली आहे. त्याचबरोबर अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचे कामही गतीमान करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

समितीच्या मते, हा प्रकल्प साकार झाल्यास मुंबई ते विशाखापट्टणम या पश्चिम ते पूर्व किनारपट्टीला जोडणारा देशातील सर्वात मोठ्या रेल्वे प्रकल्पांपैकी एक मार्ग निर्माण होईल. तसेच कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा यांना मुंबईशी अधिक जवळच्या मार्गाने जोडणारी वाहतूक व्यवस्था उपलब्ध होईल.

या रेल्वेमार्गामुळे बीड, परळी, अहिल्यानगर, जुन्नर, मुरबाड तसेच अकोले आणि संगमनेरच्या दक्षिण डोंगराळ भागातील शेती, उद्योग आणि पर्यटनाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास समितीने व्यक्त केला आहे. माळशेज घाट, शिवनेरी, लेण्याद्री आणि भीमाशंकर या पर्यटनस्थळांचा विकास होऊन रोजगारनिर्मिती वाढेल. साखर, भाजीपाला, फळे आणि इतर कृषी उत्पादने मुंबईमार्गे देश-विदेशात निर्यात करण्यास मोठी मदत होईल, त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

समितीने सांगितले की, या रेल्वेमार्गासाठी स्वातंत्र्यसैनिक गोविंदभाई श्रॉफ, खासदार केशरकाकू क्षीरसागर, पत्रकार सुधाकर डोईफोडे, आमदार श्रीकृष्णराव तांबे, निवृत्तीशेठ शेरकर, प्रकाश परांजपे, शांतारामबापू घोलप, प्रा. रामभाऊ कापसे, गोपीनाथ मुंडे, बाळासाहेब विखे पाटील, दिलीप गांधी, गुलाबराव शेळके यांच्यासह अनेक दिग्गजांनी सातत्याने मागणी केली होती.

सन १९९६ पासून माळशेज रेल्वे कृती समितीच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून निर्धार मेळावे, रेल्वे परिषदा, जनजागृती यात्रा, रेल्वे रथयात्रा, पाच लाख सह्यांची मोहीम आणि दिल्लीपर्यंत पाठपुरावा करण्यात आला. या प्रयत्नांतून २००६ मध्ये रेल्वे सर्वेक्षण झाले, तर २०१९ मध्ये मुरबाडपर्यंतचा पहिला टप्पा मंजूर झाला असल्याचे समितीने स्पष्ट केले. या रेल्वे प्रकल्पासाठी शरद पवार, अण्णा हजारे, खासदार सुप्रिया सुळे, शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, बाळासाहेब थोरात आणि शिवाजीराव नलावडे यांच्यासह अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभल्याचे समितीने नमूद केले. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी कल्याण-अहिल्यानगर 'थर्ड घाट रेल्वे प्रकल्प' मंजूर व्हावा यासाठी येत्या काळात बीड, परळीपासून कल्याणपर्यंत सर्वपक्षीय कार्यकर्ते, शेतकरी, युवक आणि नागरिकांना एकत्र करून व्यापक लोकआंदोलन उभारण्यात येणार असल्याचा निर्धार माळशेज रेल्वे कृती समितीने व्यक्त केला आहे.

## मॉडर्न हायस्कूल चेअरमनपदी प्रतिमा कुलकर्णी,ज्ञानवर्धिनी बालक मंदिरच्या चेअरमनपदी अमोल वैद्य तर प्रशासकीय अधिकारी पदी संतोष कचरे यांची निवड





अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जपणाऱ्या व अकोले तालुक्यातील सर्वात जुन्या असलेल्या मॉडर्न हायस्कूल अकोले च्या चेअरमन पदी सामाजिक कार्यकर्त्या सौ. प्रतिमा हेरंब कुलकर्णी यांची तर ज्ञानवर्धिनी बालक मंदिर या नामांकित शैक्षणिक संस्थेच्या चेअरमनपदी ज्येष्ठ पत्रकार अमोल वैद्य यांची एकमताने निवड करण्यात आली.तर हिंद सेवा मंडळ संचलीत अकोले विभागाच्या प्रशासकीय अधिकारी पदी सेवानिवृत्त प्राचार्य संतोष कचरे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

प्रतिमा कुलकर्णी यांचे शिक्षण एम ए बी एड झाले असून यांनी शिक्षक म्हणून काम केले असून बाल आनंदवाडी ही प्रयोगशील बालवाडी अनेक वर्षे चालवली आहे.एकल महिलांच्या प्रश्नावर व त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी सध्या काम करत आहेत. सामाजिक व विधायक उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग असतो.त्यांची मॉडर्न हायस्कूल च्या चेअरमन पदी निवड करण्यात आली आहे.

अमोल वैद्य यांचे शिक्षण एम. ए. बी. एड. व डिप्लोमा जर्णालिझम झाले असून सध्या ते अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. तसेच सुगाव खुर्द गावचे माजी सरपंच,महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष,रोटरी क्लब अकोलेचे संस्थापक आणि रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ चे माजी असिस्टंट गव्हर्नर म्हणून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक कार्यात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वक्षमतेची दखल घेत संस्थेने त्यांच्यावर चेअरमनपदाची जबाबदारी सोपविली आहे.

तर सेवा निवृत्त प्राचार्य संतोष कचरे हे जनजाती कल्याण समितीचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. जनजाती कल्याण आश्रम येथील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा व गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यासाठी ते नेहमीच आग्रही राहिले आहेत.

त्यांच्या या निवडी बद्दल हिंद सेवा मंडळाचे मानत सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, संचालक दिलीपकुमार शहा, सचिव सहाय्यक योगेश देशमुख, मॉडर्न ज्युनियर कॉलेजचे चेअरमन, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे यांचेसह मंडळाचे सर्व पदाधिकारी व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, पालक व विविध क्षेत्रातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## तांदलवाडी येथे विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप




रावेर/चंद्रकांत कोळी (समर्थ गांवकरी)

रावेर (सगांवकरी ) तालुक्यातील तांदलवाडी येथील जिल्हा परिषद मराठी मुलांची केंद्र शाळेत शासनाच्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह, प्रेरणा व आवड निर्माण व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी तांदलवाडी ग्रामपंचायत सदस्या सौ. साधना योगेश्वर कोळी, तसेच महाएकता फाउंडेशन तांदलवाडीचे अध्यक्ष श्री. योगेश्वर कोळी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मंगेश उन्हाळे, समिती सदस्य सीमा चौधरी, ललिता भोई, शिक्षणतज्ज्ञ अशोक फकीरा महाजन , तसेच शिक्षक श्री. दत्तात्रय तायडे व प्रभाकर गंभिर पाटील ,आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून , उपस्थितांनी शासनाच्या या उपक्रमाचे स्वागत केले आहे .

## घाटघर परिसरात भात लागवडीला वेग; दमदार पावसाने शेतकऱ्यांना दिलासा, भंडारदरा धरणाच्या जलसाठ्यातही वाढ!




भंडारदरा (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील भंडारदरा परिसरातील उडदावणे, शिंगणवाडी, लवडवाडी, घाटघर आदी भागांत यंदाच्या खरीप हंगामातील भात लागवडीच्या कामाला सुरुवात झाली आहे. गेल्या चार-पाच दिवसांपासून घाटघर व परिसरात सातत्याने हलका, मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस होत असल्याने भात खाचरांमध्ये पुरेसे पाणी साचले आहे. तसेच भाताची रोपे लागवडीसाठी योग्य अवस्थेत आल्याने शेतकऱ्यांनी शेतात उतरून लागवडीची कामे सुरू केली आहेत.

घाटघर परिसरातील शेतकरी पारंपरिक पद्धतीने रोहिणी नक्षत्रात भात रोपांची पेरणी करतात. या काळात पेरणी केल्यास रोपांची वाढ चांगली होते आणि लागवडही वेळेत पूर्ण करता येते, असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. यंदा मान्सूनचे आगमन काहीसे उशिरा झाले असले तरी मध्यंतरी झालेल्या अवकाळी पावसामुळे भात रोपांना जीवदान मिळाले. त्यामुळे रोपे जोमाने वाढून आता लागवडीसाठी तयार झाली आहेत.

'पावसाचे माहेरघर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घाटघर परिसरात आता मान्सूनने चांगलाच जोर धरला आहे. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे भात शेतीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले असून ज्या शेतकऱ्यांची रोपे तयार झाली आहेत, त्यांनी लागवडीला वेग दिला आहे. यामुळे परिसरातील शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, सातत्याने होत असलेल्या पावसामुळे भंडारदरा धरणाच्या जलसाठ्यातही लक्षणीय वाढ होत आहे. मागील २४ तासांत धरणात २१८ दशलक्ष घनफूट पाण्याची आवक झाली असून धरणातील एकूण जलसाठा ३,२३४ दशलक्ष घनफूट इतका झाला आहे.

मागील २४ तासांतील पर्जन्यमान पुढीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहे - घाटघर ८६ मि.मी., पांजरे ५७ मि.मी., भंडारदरा ६० मि.मी. आणि वाकी ४६ मि.मी. इतका पाऊस झाला. या दमदार पावसामुळे खरीप हंगामाला चालना मिळाली असून आगामी काही दिवस पाऊस कायम राहिल्यास भात लागवडीची कामे अधिक वेगाने पूर्ण होतील, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने सन २०२५-२०२६ मध्ये घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत एकाच मढ गावातील तसेच एकाच पानसरे परिवारातील तीन विद्यार्थ्यांनी पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकाविले

जुन्नर/रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)





शंकरराव बुट्टे पाटील विद्यालयात सेमी मराठी माध्यमातून शिकत असलेला तनुज रविंद्र पानसरे पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २२४ गुण मिळवून जुन्नर तालुक्यात शहरी भागातून द्वितीय आला असून त्याची पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. चैतन्य विद्यालय ओतूर या शाळेत शिकत असलेली कुमारी स्वरा छगन पानसरे ब्रेन डेव्हलपमेंट परीक्षेत गोल्ड मेडल मिळवलेली तसेच आय एम विनर या परीक्षेत राज्यात द्वितीय येऊन पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २४६ गुण मिळवून पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झालेली आहे.

महात्मा गांधी विद्यालय राजगुरुनगर या शाळेत शिकत असलेली सुमेधा विनायक पानसरे सन २०२२- २०२३ मध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादी निवड झाली होती. सन २०२५-२०२६ मध्ये देखील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २३४ गुण मिळवून पुणे जिल्हा गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. हे तीन विद्यार्थी एकाच गावातील एकाच पानसरे कुटुंबातील असल्यामुळे मढ गाव व पानसरे परिवाराने इतिहास केल्याची सर्वत्र चर्चा आहे. संपूर्ण जुन्नर तालुक्यातील कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## अहिल्यानगर येथील ज्येष्ठ विधिज्ञ ड. वसंतराव मनकर व अकोले नगरपंचायतीच्या नगरसेविका प्रतिभा मनकर यांचा दैनिक समर्थ गांवकरी समूहाकडून गौरव!

अकोले (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील नामांकित विधितज्ज्ञ तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे किसान सभा प्रांतिक अध्यक्ष ड. वसंतराव मनकर आणि अकोले नगरपंचायतीच्या नगरसेविका प्रतिभाताई मनकर यांचा दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या प्रतिनिधींनी ॲड. वसंतराव मनकर व नगरसेविका यांना घड्याळ, हरिपाठ आणि पेन भेट देऊन त्यांच्या सामाजिक, राजकीय व लोकहिताच्या कार्याबद्दल शुभेच्छा व्यक्त केल्या. समाजहिताची जपलेली बांधिलकी, जनसामान्यांच्या प्रश्नांबाबत असलेली संवेदनशीलता आणि सातत्यपूर्ण लोकसेवा याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. याप्रसंगी उपस्थितांनी ॲड. वसंतराव मनकर यांच्या विधी क्षेत्रातील योगदानासह कृषी व सामाजिक क्षेत्रातील कार्याचा गौरव केला. तसेच अकोले नगरपंचायतीच्या नगरसेविका यांनी स्थानिक विकासकामे, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न आणि लोकाभिमुख कार्य याबद्दलही समाधान व्यक्त करण्यात आले. दैनिक समर्थ गावकरी समूहाने पुढील वाटचालीसाठी दोघांनाही मनःपूर्वक शुभेच्छा देत, त्यांच्या कार्यातून समाजहिताची सेवा अधिक प्रभावीपणे घडत राहो, अशी सदिच्छा व्यक्त केली.



# टाकेदच्या कातकरी वस्तीत घरांमध्ये पाणी

## जनजीवन विस्कळीत ; इगतपुरी तालुक्याच्या पूर्व भागात जोरदार अतिवृष्टी नद्या नाल्यांना पूर

सर्वतीर्थ टाकेद (समर्थ गांवकरी)

**इगतपुरी तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या दोन दिवसापासून जोरदार बरसात असलेल्या अतिवृष्टीच्या पावसामुळे नद्या नाल्यांना महापूर आला असून या सततच्या जोरदार ढगफुटी सदृश्य अतिवृष्टीमुळे टाकेद परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.**

गेल्या दोन दिवसांपासून जोरदार अतिवृष्टीमुळे टाकेद येथील कडवा नदी दुथडी भरून वात आहे तसेच टाकेद येथील करंजी ओहोळ ,लेंडी नाला अडसरे बु येथील ओहळ,व परिसरातील सर्वच नाल्यांना जणू काही नद्यांचे स्वरूप प्राप्त झाले आहे तसेच टाकेद येथील लेंडी नाल्याला मोठ्या प्रमाणात पूर आल्याने रस्त्यावरून पाणी वाहत असल्याकारणाने रस्त्यावरील वाहतूक काही काळ बंद झाली होती तसेच आडसरे बुद्रुक या ठिकाणी असलेल्या नाल्याला मोठ्या प्रमाणात पुराचे पाणी आल्यामुळे त्या ठिकाणी देखील रस्ता बंद झाला होता टाकेद परिसरातील सर्वच नद्या नालेओहळांना जोरदार अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पूर आल्यामुळे या भागातील सर्वच रस्ते पाण्याखाली गेले होते तसेच गेल्या वीस वर्षा नंतर टाकेद येथील कडवा नदीला सर्वाधिक मोठा महापूर आला आहे नव्याने बांधण्यात आलेल्या पुलावरून देखील पाणी उलटले आहे तसेच गेल्या दोन-तीन दिवसापासून जोरदार अतिवृष्टीमुळे या भागातील सोनोशी बाबळेवाडी घोडेवाडी शिरेवाडी मायदरा धानुषी आडसरे बुद्रुक बारिश शिगवे वासाळी, इंदुरे, खडकेद, फळवीरवाडी, भंडारदरा वाडी, निनावी, आधारवड आदी गावांसह परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे यासोबतच या भागामध्ये गेल्या दहा दिवसांपासून जिओ मोबाईल नेटवर्क बंद आहे या कारणास्तव या भागामध्ये दूरध्वनी द्वारे कोणत्या ठिकाणी संपर्क सुद्धा होत नाही तसेच जोरदार अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे भाताचे राब शेतातील बांध फुटून झाडे झुडपे याचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे तसेच टाकेद बुधवार पेठ असल्याने व शाळेचे शिक्षणाचे माहेरघर असल्याकारणाने या भागातील बाजारपेठ शाळा महाविद्यालय सर्व प्रशासकीय यंत्रणा या ठिकाणी बंद आहे.

ग्रामपंचायत टाकेद बुद्रुक येथील आदिवासी आदिम कातकरी वस्तीमध्ये झोपड्यांमध्ये घरांमध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात घुसल्याने या ठिकाणचे जवळपास ४८ कुटुंबांचे जनजीवन विस्कळीत झाले असून ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे आदिवासी आदिवासी कातकरी कुटुंबीयांवर ही परिस्थिती निर्माण झाली आहे ग्रामपंचायत च्या पेसा निधी मधून या आदिवासी कातकरी वस्तीत ड्रेनेज पाईपलाईनचे काम फक्त नावाला करण्यात आले असून या पाईपलाईन मधून पावसाचे पाणी पास होत नसल्याकारणाने कातकरी वस्तीच्या मागील शेतात मधून मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी आल्याने व शेतामधील बांध फुटल्याने सर्व पाणी कातकरी वस्ती मधील झोपड्यांमध्ये शिरले या परिस्थितीमुळे कातकरी वस्तीतील नागरिकांचे जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. पावसाच्या पाण्यामुळे झोपडपट्टी घरांमधील जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान कातकरी वस्ती मध्ये नागरिकांचे एवढे मोठे नुकसान झाले असताना सुद्धा स्थानिक गाव पुढारी स्थानिक प्रशासन लोकप्रतिनिधी यांनी अजिबातही या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित कातकरी वस्तीतील लोकांची दखल घेतली नाही ही लाजिरवाणी गोष्ट बघावयास मिळाली तसेच याची माहिती इगतपुरी चे तहसीलदार अभिजीत बारवकर यांना मिळताच तहसीलदार यांनी सामाजिक कार्यकर्ते राम शिंदे यांना संपर्क करून मांजरगाव येथे तैनात असलेली त्यांची आपत्ती व्यवस्थापन टीम मंडळ अधिकारी स्थानिक तलाठी ग्रामविकास अधिकारी यांच्यासह घटनास्थळी प्रत्यक्ष पाणी आणि पंचनामा करण्यासाठी पाठवली तसेच गेल्या पाच सात वर्षांपासून टाकेद येथील आदिम कातकरी नागरिक या वस्तीमधील पाण्याचा निचरा व्हावा यासाठी मोठ्या पाईपलाईनच्या गटारी पावसाचे पाणी वस्तीत येऊ नये यासाठी वस्तीच्या मागच्या बाजूला संरक्षण भिंत व घरकुलांची सातत्याने मागणी करत आहे जवळपास ३२ कुटुंबांचे आदिम जनमन घरकुल योजनेअंतर्गत घरकुले ४ वर्षांपासून मंजूर



आहेत परंतु अद्याप पर्यंत इगतपुरी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व स्थानिक प्रशासन यांनी कोणत्याही प्रश्नाला अजिबातही न्याय दिलेला नाही आजपर्यंत घरकुले मंजूर असूनही घरकुलाचा एकही हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यावर पाठविलेला नाही जागेचे कारण दाखवून घरकुलाचे हप्ते लटकवले आहेत मुळात कातकरी वस्ती ही सरकारी जागेवर असून हा इतिहास जागेवर त्यांचे घरकुले बांधण्यात काही हरकत नसल्याने तरीदेखील या प्रश्नाकडे गेल्या पाच वर्षांमध्ये एकाही लोकप्रतिनिधी अथवा स्थानिक प्रशासन व गटविकास अधिकारी यांनी अजिबातही बघितले नाही गटविकास अधिकारी यांना अनेकदा निवेदनाद्वारे व बिऱ्हाड मोर्चा नेऊन कळविले होते की आपण स्वतः जातीने लक्ष घालून टाकेत येथील आदीम कातकरी वस्तीची प्रत्यक्षात पाहणी करा व या कुटुंबांचा घरकुलाचा प्रश्न गटारीचा प्रश्न शौचालयाचा प्रश्न संरक्षण भिंत ड्रेनेज या सर्व भौतिक गरजा आपण स्वतः प्रत्यक्षात सोडवाव्यात अशी निवेदनाद्वारे अनेकदा मागणी करून देखील आज पर्यंत गटविकास अधिकारी यांनी व त्यांच्या टीमने कोणीही या वस्तीमध्ये प्रत्यक्षात पाहणी केली नाही स्थानिक ग्रामपंचायतीचे लोकप्रतिनिधी ठेकेदार अधिकारी यांनी फक्त टक्केवारीसाठी या वस्तीमध्ये ड्रेनेज रस्ते तयार केले परंतु त्या गटारींचा सुद्धा या वस्तीला अजिबातही उपयोग झालेला दिसत नाही ड्रेनेचे पाय फक्त नावाला टाकलेले असून या ड्रेनेच्या पाईपलाईन मधून अजिबातही पावसाचे पाणी पास होत नाही या कारणास्तव जोरदार झालेल्या अतिवृष्टीचे पाणी कातकरी नगर मधील रस्त्याला आडून कातकरी वस्तीतील घरांमध्ये घुसले आहे याला सर्वस्वी जबाबदार स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन व तालुक्याचे गट विकास अधिकारी हे आहेत दरम्यान यापुढे जर कातकरी लोकांचा घर कोणाचा प्रश्न गटारींचा पाण्याचा प्रश्न संरक्षण भिंतीचा प्रश्न शौचालय या सर्वच भौतिकारदांचा प्रश्न तालुक्याचे तहसीलदार गटविकास अधिकारी स्थानिक प्रशासन यांनी सोडविला नाही तर येणाऱ्या काळामध्ये गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचे जालनामध्ये आम्ही स्वतः येऊन विराट मोर्चा आणून राहू असा इशारा टाकेदेखील आदिवासी कातकरी बांधवांनी प्रशासनाला दिलेला आहे.

कुठ रहावं कुठ जावं व कस जगावं आम्ही, सर्व घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले असून आम्हांला राहायला सुद्धा जागा नाही,कोणीच आमच्या मदतीला नाही,गेल्या पाच दहा वर्षांपासून आम्ही ग्रामपंचायतला सांगतोय आम्हांला चांगली घरे द्या ,गटारी बांधून द्या परंतु कुणीही आमची दखल घेत नाहीच परंतु आमच्याकडे मतदानाशिवाय कुणीही फीरकत नाही रडल्याशिवाय आमच्याकडे दुसरा कोणताही पर्याय उरला नाही.

गोदाबाई भोईर, विधवा निराधार ग्रामस्थ टाकेद कातकरी वस्ती

प्रधानमंत्री जन मन घरकुल आवास योजनेअंतर्गत सर्व कातकरी वस्तीतील बांधवांचे घरकुले गेली चार वर्षांपासून मंजूर असून सुद्धा व जागा उपलब्ध असताना सुद्धा प्रशासनाने मुद्दामून घरकुलांचे हप्ते रखडून ठेवल्याने व ग्रामपंचायतच्या ठेकेदारांनी फक्त टक्केवारीसाठी गटारीचे काम या वस्तीमध्ये केल्याने आज ही परिस्थिती निर्माण झाली आहे दोन दिवसांपासून टाकेद येथील कातकरी वस्ती मध्ये घरांमध्ये पूर्णतः पावसाच्या पाण्याचे साम्राज्य पसरले असून अद्याप पर्यंत एकही लोकप्रतिनिधी अथवा स्थानिक प्रशासकीय अधिकारी प्रशासन या ठिकाणी पाहणी करायला आलेला नाही स्थानिक प्रशासनाने सदर कातकरी वस्तीची तात्काळ पाहणी करून व पंचनामा करून या सर्व या सर्व ग्रामस्थांना नुकसान भरपाई देऊन त्यांचा घरकुलांचा प्रश्न व गटारीचा पाण्याचा प्रश्न तात्काळ सोडवावा व त्यांना न्याय द्यावा

**- राम शिंदे सामाजिक कार्यकर्ते टाकेद बु,**

दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने आमच्या कातकरी वस्तीच्या मागच्या बाजूने शेताचे बांध फुटल्याने गटारीच्या पाईप मधून पाणी पास होत नसल्याने सर्व पाणी वस्तीमधील आमच्या घरांमध्ये घुसले आहे आमच्या लहान सान पोरांसह कोंबड्या शेळी मेंढी बकरे सर्व जनजीवन विस्कळीत झाले आहे तरी अद्यापही आमच्या मदतीला कोणीही आलेले नाही घरातील चुलींमध्ये देखील पाणी पसरले आहे पोटापाण्यासाठी आम्ही करायचं काय आणि कुठे राहायचं कोण आम्हाला तारणहार म्हणून पुढे येईल याची वाट पाहून सुद्धा आम्ही थकलो यापुढे आता आम्हाला जर न्याय नाही मिळाला तर आम्ही तालुक्याच्या तहसीलदार व पंचायत समिती कार्यालयामध्ये येऊन राहणार आहे.

**- निवृत्ती हिलम ,ग्रामस्थ कातकरी वस्ती टाकेद बु.**

# आंबे, हातवीज व इंगळून भागात दरड कोसळल्याने वाहतुकीस अडथळा

शिवनेरी (समर्थ गांवकरी)



जुन्नर आदिवासी दुर्गम भागातील आंबे , हातवीज व इंगळुन या भागात मुसळधार पाऊस पडल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे . या भागातील ठिकठिकाणी दरड , झाडे झुडपे कोसळल्याने रस्ता वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे .

येथील सर्व आदिवासी बांधवांनी घरीच थांबा, गरज असल्यास रस्त्यावरून जाताना काळजी घ्यावी. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठ मोठे दगड मातीचे ढीग कोसळले आहेत . त्यामुळे वाहतुकीस ये -- जा खुला झाल्याशिवाय कोणीही रस्त्याने जाऊ नये . पावसाचा जोर सातत्याने वाढत असल्यामुळे डोंगरावरील व टेकडी येथील माती व झाडेझुडपे, रस्त्यावर पडण्याची दाट शक्यता आहे . त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी असे आव्हान तहसीलदार बाळासाहेब शिरसाठ यांनी केले आहे. आज दि . ६ वार सोमवार रोजी जुन्नर , ८० मि . मी . , नारायणगाव ६० मि.मी , ओतूर ४८ मि. मी , वडगाव आनंद १५ मि. मी , निमगाव सावा १९ मि. मी. , बेल्हे २० मि मी . , आपटाळे ९८ मि. मी. , डिंगोरे १२० मि. मी. , व राजुर १३७ मि . मी . पाऊस पडला आहे.

# भर पावसातही डॉ. सुजय विखे पाटील ग्राऊंडवर; विकासकामांचा घेतला आढावा

## लोणी व कोल्हार येथे विकासकामांची पाहणी करत जाणून घेतल्या नागरिकांच्या अडचणी







लोणी/कोल्हार (समर्थ गांवकरी)

भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी सोमवारी सकाळी लोणी खुर्द व लोणी परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करत नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. कोल्हार-नांदूर शिंगोटे महामार्गाच्या कामाची ग्रामस्थांसमवेत पाहणी करून कामाचा दर्जा, वाहतुकीची सुविधा आणि पावसाळ्यात नागरिकांना होणाऱ्या अडचणींचा आढावा घेतला. यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत कामात कोणतीही हलगर्जीपणा होऊ नये, असे निर्देश त्यांनी दिले.

लोणी खुर्दयेथे सुरू असलेल्या महामार्गाचे व गटर बांधकामाचीही त्यांनी ग्रामस्थांसोबत पाहणी केली. नागरिकांनी मांडलेल्या विविध समस्या व सूचनांची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी भर पावसातही डॉ. सुजय विखे पाटील यांनी लोणी येथील एका पंक्चर दुकानातच जनता दरबार भरविला. मतदारसंघासह जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी निवेदनांच्या माध्यमातून आपल्या समस्या मांडल्या. प्रत्येकाचे म्हणणे शांतपणे ऐकून संबंधित विभागांशी संपर्क साधत प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी तात्काळ सूचना दिल्या. त्यानंतर कोल्हार येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामाचीही ग्रामस्थांच्या उपस्थितीत पाहणी करण्यात आली. तसेच कामातील त्रुटी निदर्शनास आणून देत संबंधित अधिकारी व ठेकेदारांना गुणवत्तापूर्ण आणि वेळेत काम पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिल्या. भर पावसातही प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन विकासकामांचा आढावा घेणे, नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देणे आणि कामांच्या गुणवत्तेबाबत ठाम भूमिका घेणे, यामुळे उपस्थित ग्रामस्थांनी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कार्यपद्धतीचे स्वागत केले.

# एमकेसीएलच्या ऑनलाईन आय लाईक क्रेडिट कोर्सद्वारे विद्यार्थ्यांसाठी नवी संधी

जुन्नर/रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)



येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड (MKCL) यांच्या i Like Credit कोर्सेस या अभिनव शैक्षणिक उपक्रमा द्वारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये विद्यार्थ्यांना ज्ञान,कौशल्य आणि शैक्षणिक प्रगतीसाठी नवी संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे,अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाठ व उपक्रमाचे समन्वयक प्रा. रोहिदास मेमाणे यांनी दिली.

iLike åhUOo Incredible Learning Innovations for KnowledgeEmpower ment.या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक, कौशल्याधारित व क्रेडिट- आधारित शिक्षण उपलब्ध करून देणे हा आहे.या अभ्यास क्रमांमुळे विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणासोबतचरोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळणार आहे. या क्रेडिट कोर्सेसमध्ये विविध विषयांवरील अभ्यासक्रमांचा समावेश असून, विद्यार्थ्यांना लवचिक पद्धतीने शिक्षण घेता येणार आहे. तसेच, डिजिटल माध्यमातून अध्ययन, स्वयंअध्ययन व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक साधनांचा लाभही या उपक्रमातून मिळणार आहे.

शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या एमकेसीएलच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान अधिक सशक्त होण्याबरोबरच त्यांची रोजगार क्षमता वाढण्यासही मदत होईल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.विद्यार्थी, पालक व शैक्षणिक संस्थांनी या उपक्रमाचा लाभ घेऊन भविष्या तील स्पर्धात्मक युगासाठी स्वतःला अधिक सक्षम बनवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या क्रेडिट कोर्सेसमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्याविद्यार्थ्यां नी अधिक माहितीसाठी अण्णा साहेब वाघिरे महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाठ यांनी केले. तसेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सर्व पदाधिकारी यांचे बहुमूल्य मार्गदर्शन वेळोवेळी मिळत आहे.

# गोरक्षनाथ गडावरून पायी दिंडीचे १४ जुलैं ला पंढरपूरला प्रस्थान

## १५ व १६ जुलैला नगर शहरात आषाडी दिंडी सोहळा थांबणार

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



येथून जवळच असणाऱ्या मांजरसुंबा येथील गोरक्षनाथ गडावरून सालाबादप्रमाणे दिनांक १४ जुलै रोजी श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड ते पंढरपूर आषाडी दिंडी सोहळा प्रस्थान करणार असून दिंडीचे हे ४० वे वर्ष आहे.

वैकुंठवासी बाळकृष्ण महाराज कदम यांनी प्रारंभ केलेली व राम महाराज पोते,वैगोरक्षनाथ महाराज ढोकणे, भाऊसाहेब महाराज हरिचंद्रे व दिंडी सोहळा ट्रस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली गर्भगिरी डोंगर रांगेतील नगर तालुक्यातील मांजरसुंबा येथील श्रीक्षेत्र गोरक्षनाथ गड येथून १४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता निघणार आहे,यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दिंडी सोहळ्यात दररोज पहाटे ४ते५ श्री पूजा व अभिषेक,पहाटे ५ते ६आरती व दर्शन दुपारी प्रवचन व रात्री कीर्तन नंतर दिंडी प्रवासात अखंड भजन होणार आहे दिंडी सोहळाचा पंढरपूर येथील मुक्काम श्री चैतन्य गोरक्षनाथ मंदिर,पंढरपूर टेंभुर्णी नाका,शिंदे नाईक मळा, पंढरपूर येथे राहणार आहे.

दिंडी सोहळा गोरक्षनाथ गडावरून निघाल्यावर पहिला मुक्काम पिंपळगाव माळवी येथे राहणार असून दुसरा मुक्काम १५ जुलैला नगर मधील सावेडीतील सहकारनगर मध्ये राहणार असून तेथील व्यवस्था माऊली कृपा मित्र मंडळ यांनी केली आहे दि. १६ जुलैला दिंडी सोहळा समतानगर येथे डॉ प्रकाश जाधव यांचे येथे सकाळचा नाश्ता घेणार असून रात्रीचा मुक्काम नगर तालुक्यातील दहिगाव येथे राहणार आहे तर दिनांक १९ जुलै रोजी चापडगाव येथे घोड्याचे रिंगण होणार आहे. पुढे करमाळा मार्गे पंढरपूरला हा सोहळा पोचणार आहे. द्वादशीला काल्याचा प्रसाद झाल्यानंतर दिंडी सोहळा विसर्जित होणार आहे.

# श्री देविदास सोनटक्के यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड; विद्यालयात अभिनंदनाचा वर्षाव

पाथर्डी/राजेंद्र चव्हाण (समर्थ गांवकरी)

निसर्ग आणि सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य या मंडळाच्या अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्ष पदावर श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. देविदास सोनटक्के यांची सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या निवडीमुळे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

श्री देविदास सोनटक्के यांनी शिक्षण क्षेत्राबरोबरच पर्यावरण संवर्धन, सामाजिक जनजागृती आणि विविध उपक्रमांमध्ये सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत मंडळाने त्यांच्यावर जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे.

यावेळी श्री शिवाजीराव कराड (गटशिक्षणाधिकारी) पंचायत समिती पाथर्डी, यांनी श्री सोनटक्के यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. त्यांनी आपल्या शुभेच्छापर मनोगतात श्री सोनटक्के यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील सामाजिक व पर्यावरण विषयक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर विद्यालयाच्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवकवृंद यांच्या वतीनेही श्री देविदास सोनटक्के यांचा सत्कार करून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करत, त्यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण संवर्धन व सामाजिक कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

श्री सोनटक्के यांनी सर्वांचे आभार मानत, मंडळाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत पर्यावरण संरक्षण, सामाजिक जनजागृती आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.